जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७३८ दिनांक - १०/१०/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# तिलकसिंग गब्बरसिंग टाक (टोळी प्रमुख) व त्याचे इतर १० साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई

यातील फिर्यादी हे दि.०७/०९/२०२३ रोजी चंदवाडी केनॉल रोड,फुरसुंगी,पुणे याठिकाणाहुन त्यांचे राहते घरी जात असताना,कारमधून आलेल्या ०५ ते ०६ इसमांनी व दोन मोटार सायकलवरुन आलेल्या त्यांच्या ०६ साथीदारांनी मिळुन,फिर्यादी यांचे डोक्याला पिस्टल लावुन,आवाज मत निकाल,नही तो तुझे मार डालुंगा,चल निकल यहासे असे म्हणुन फिर्यादीस हाताने व लाथाने मारहाण करून, अज्या,बुटक्या इसको ठोक दो असे बोलुन,त्यांचे खिशातील पाकिट जबरदस्तीने काढून घेवुन,अगर किसीको कुछ बताया,या पोलीस मे कम्प्लेंट किया तो तुझे खतम करेंगे अशी धमकी देवुन,मोटार सायकलवरून निघून गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१३४५/२०२३ भादंवि कलम ३९५,३९७,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम३(२५),महाराष्ट्र पो.अधि कलम ३७(१)(३)सह १३५** अन्वये गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा तपास हडपसर पो स्टे व गुन्हे शाखा,पुणे शहर असे समांतर तपास करीत असताना,युनिट-०२ गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे बातमीरादारामार्फत मिळालेल्या बातमीवरुन सापळा लावुन पोलीस अभिलेखावरील दाखल गुन्हयातील आरोपी १)**तिलकसिंग गब्बरसिंग टाक,वय-२८ वर्षे,रा.स.नं.१०९/११०,रामटेकडी,हडपसर,पुणे (टोळी प्रमुख) (पाहिजे आरोपी) २)अजयसिंग अर्जुनसिंग दुधानी,वय २१ वर्षे,रा.७२,घरकुल मांजरी-बद्रुक,हडपसर पुणे) ३)बच्चनसिंग जोगिंदरसिंग भोंड, वय-२५ वर्षे,रा.ग.नं.७,बिराजदारनगर,वैदवाडी,पुणे ४)अक्षयसिंग बिरुसिंग जुन्नी,वय २५ वर्षे,रा.गल्ली नं.७, हडपसर,पुणे (पाहिजे आरोपी) ५)करणसिंग रजपुतसिंग दुधाणी,रा स.नं.११३,राम नगर, हडपसर,पुणे (पाहिजे आरोपी) ६)लखनसिंग राजपुतसिंग दुधाणी,रा.सनं.१०९/११०,रामटेकडी,हडपसर,पुणे (पाहिजे आरोपी) ७)कन्वरसिंग काळुसिंग टाक,रा.तुळजा भवानी वसाहत,हडपसर,पुणे ८)राहुल रविंद्रसिंग भोंड, रा. तुळजाभवानी वसाहत,हडपसर,पुणे (पाहिजे आरोपी) ९)सोहेल जावेद शेख,रा.बिराज दारनगर,गोसावी वस्ती,हडपसर,पुणे (पाहिजे आरोपी) १०)रामजितसिंग रणजितसिंग टाक,वय-२१,रा.तुळजा भवानी वसाहत, हडपसर,पुणे ११)एक विधीसंघर्षित बालक (टोळी सदस्य)** यातील आ.क्र.२,३,७,१० यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन,अ.क्र.११ यास ताब्यात घेण्यात आले आहे.

नमुद आरोपीं तिलकसिंग गब्बरसिंग टाक(टोळी प्रमुख) याने संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असून,त्यांनी हडपसर,रामटेकडी,आनंदनगर,वानवडी या भागात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढविण्यासाठी तसेच इतर साथीदारांसह मालमत्ते विरुध्दचे तसेच शरीरा विरूध्दचे गुन्हे त्यामध्ये घातक शस्त्र बाळगुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घातक शस्त्र बाळगुन दरोडा टाकणे, जबरी चोरी करणे, वाहन चोरी करुन, त्याच वाहनातुन दरोडे टाकणे,नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणे,येणारे-जाणारे लोकांना कोयते दाखवुन त्यांचेकडे पैशाची मागणी करणे,एकत्रित पणे छोटे व्यवसायिक व दुकानदार तसेच पथारीवाले यांना दमदाटी करुन,त्यांचे मनामध्ये दहशत निर्माण करुन त्यांचे कडुन फुकट वस्तु घेऊन जाणे असे गंभीर गुन्हे वारंवार करीत असतात. त्यांचे दहशतीमुळे त्यांचे विरुध्द कोणीही तक्रार देण्यास पुढे येत नाही. तसेच त्यांचे विरुध्द

पुणे शहरातील वेगवेगळया पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेची माहिती मिळुन आली. त्याने व त्याचे टोळीतील सदस्यांनी पुणे शहर हडपसर परिसरात मोठया प्रमाणात दहशत निर्माण केली आहे.

दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२), ३(४) चा अंतर्भाव करण्याकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पो स्टे पुणे शहर,श्री.रविंद्र शेळके यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१३४५/२०२३,भादंवि कलम ३९५,३९७, ५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ३(२५),महाराष्ट्र पो.अधि कलम ३७(१)(३)सह १३५ अन्वये दाखल असलेल्या गुन्हया मध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.अश्विनी राख हया करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त, परीमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती.अश्विनी राख यांचे मार्गर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.रविंद शेळके, पोलीस निरीक्षक,(गुन्हे), श्री.विश्वास डगळे, सहा.पोलीस निरीक्षक,बर्गे तसेच हडपसर निगराणी पथकातील पोलीस अंमलदार, प्रविण शिंदे, गिरीश एकोर्गे, महेश उबाळे, राजश्री खैरे वसीम शेख, बाबा शिंदे, राकेश चव्हाण यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ६७ वी कारवाई आहे.**